सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४

# महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२

(दिनांक १५ जुलै, २००८ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. IV of 2003

# Maharashtra Tax on the Entry of Goods into Local Areas Act, 2002

*(As modified upto the 15th July, 2008)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००९

[किंमत : रुपये ६.०० ]

# महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२

(सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४)

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**नोंदणी करणे, कर बसविणे आणि तपासणी नाकी स्थापन करणे**

३. कर बसविणे.

४. नोंदणी.

५. तपासणी नाकी स्थापन करणे.

प्रकरण तीन

**करविषयक प्राधिकारी, कराची विवरणे, निर्धारण, प्रदान, कराची वसुली व परतावा, अपिले, पुनर्विलोकन व पुनरीक्षण**

६. कर, शास्ती आणि व्याज आकारणे व वसूल करणे.

प्रकरण चार

**अपराध व शास्ती**

७. अपराध.

८. शास्ती.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

९. क्षतिपूर्ती.

१०. नियम करण्याचा अधिकार.

११. अडचणी दूर करणे.

१२. सन २००२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची.**

# सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

## महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ८ जानेवारी, २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील स्थानिक क्षेत्रांमध्ये विवक्षित मालाच्या प्रवेशावर कर बसविणे व वसूल करणे यांसाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांची कार्ये पार पाडणाऱ्या श्री. चुनीलाल करसनदास ठक्कर यांची, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक क्षेत्रांमध्ये विवक्षित मालाच्या प्रवेशावर कर बसविणे व वसूल करणे यांसाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांत मालाच्या प्रवेशावरील कर अध्यादेश, २००२ हा, दिनांक १ ऑक्टोबर, २००२ रोजी प्रख्यापित केला होता ;

२००२ चा महा. अध्या. ११.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे काही फेरबदलांचा समावेश करून राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १ ऑक्टोबर, २००२ पासून अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "निर्धारण प्राधिकारी" याचा अर्थ,—

(एक) विक्रीकर अधिनियमान्वये जो यथास्थिति नोंदणीकृत व्यापारी असेल किंवा नोंदणी केली जाण्यास पात्र असलेला व्यापारी असेल, अशा आयातकर्त्याच्या बाबतीत, विक्रीकर अधिनियमाखालील निर्धारण प्राधिकारी ; आणि

(दोन) उक्त व्यापाऱ्याव्यतिरिक्त अन्य आयातकर्त्यांच्या बाबतीत, जेथून मालाचा स्थानिक क्षेत्रात प्रवेश होईल त्या तपासणी नाक्याचा प्रभारी अधिकारी किंवा असा आयातकर्ता सर्वसाधारणपणे जेथे राहतो किंवा मालाचा वापर, उपभोग किंवा विक्री करतो त्या क्षेत्रात अधिकारिता असलेला विक्रीकर अधिनियमाखालील निर्धारण प्राधिकारी,

असा आहे ;

(ख) " मालाचा प्रवेश " याचा सर्व व्याकरणिक फेरफारांसह व तत्सम संज्ञांसह अर्थ, राज्याबाहेरील कोणत्याही ठिकाणाहून स्थानिक क्षेत्रात उपभोगासाठी, वापरासाठी किंवा विक्रीसाठी होणारा मालाचा प्रवेश, असा आहे ;

(ग) " सर्वसाधारण विक्रीकर अधिनियम " याचा अर्थ, ज्यामध्ये सर्वसाधारण मालाच्या विक्रीवर किंवा खरेदीवर अथवा त्याबाबतीत स्पष्टपणे नमूद केलेल्या कोणत्याही विनिर्दिष्ट मालावर, किंवा त्याबाबतीत स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेल्या व्यवहाराच्या कोणत्याही वर्गावर कर बसविण्याची तरतूद आहे, असा कोणत्याही राज्यात अंमलात असलेला कोणताही विक्रीकरविषयक कायदा, असा आहे ;

(घ) " मालवाहन " याचा अर्थ, मालाच्या वाहतुकीसाठी बांधणी केलेले किंवा अनुकूल बदल केलेले कोणतेही मोटार वाहन, असा आहे आणि अशी बांधणी किंवा अनुकूल बदल न केलेले इतर कोणतेही वाहन जेव्हा केवळ मालाची किंवा प्रवाशांसह मालाची वाहतूक करण्यासाठी वापरले जाते तेव्हा अशा मोटार वाहनांचा यात समावेश होतो ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " आयात " याचा व्याकरणिक फेरफारांसह व तत्सम संज्ञांसह अर्थ, राज्याबाहेरील एखाद्या ठिकाणाहून स्थानिक क्षेत्रात कोणताही माल आणणे किंवा आणण्याची व्यवस्था करणे किंवा स्वीकारणे, असा आहे ;

(छ) कोणत्याही मालाच्या संबंधात " आयातकर्ता " याचा अर्थ,—

(एक) जी व्यक्ती, एकतर तिच्या स्वतःसाठी किंवा एखाद्या प्रकर्त्यासाठी किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीसाठी एखाद्या स्थानिक क्षेत्रात, उपभोगासाठी, वापरासाठी किंवा विक्रीसाठी कोणताही माल आयात करते अशी व्यक्ती, किंवा

(दोन) अशा मालाची स्थानिक क्षेत्रात आयात करताना त्या मालाचा असलेला कोणताही मालक,

असा आहे ;

(ज) " स्थानिक क्षेत्र " याचा अर्थ,—

(एक) मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये स्थापन केलेली बृहन्मुंबई महानगरपालिका ; १९८८ चा मुंबई ३.

(दोन) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये स्थापन केलेली एखादी महानगरपालिका ; १९४९ चा मुंबई ५९.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. (तीन) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये स्थापन केलेली नागपूर शहर महानगरपालिका ;

१९६२ चा महा. ५. (चार) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन केलेली जिल्हा परिषद ;

१९२४ चा अधि. २. (पाच) कटक अधिनियम, १९२४ अन्वये स्थापन केलेले कटक मंडळ ;

यांच्या हद्दीत त्या त्या वेळेपुरते समाविष्ट केलेले क्षेत्र, असा आहे :

परंतु, पुणे कटक मंडळ व खडकी कटक मंडळ, औरंगाबाद कटक मंडळ आणि अहमदनगर कटक मंडळ यांच्या हद्दीतील क्षेत्रांना अनुक्रमे पुणे शहर महानगरपालिका, औरंगाबाद शहर महानगरपालिका व अहमदनगर नगरपरिषद यांच्या हद्दीत समाविष्ट केले असल्याचे मानण्यात येईल.

१९६२ चा महा. ५. **स्पष्टीकरण.**—उप-खंड (चार) च्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, त्या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ज्यासाठी जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली आहे, अशा जिल्ह्याच्या हद्दीतील स्थानिक क्षेत्रात, महाराष्ट्र नगर परिषदा, १९६५ चा महा. ४०. नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेल्या प्रत्येक ' अ ' वर्ग, ' ब ' वर्ग, आणि ' क ' वर्ग, नगरपरिषदांच्या हद्दीतील क्षेत्र आणि मुंबई ग्रामपंचायत १९५९ चा मुंबई ३. अधिनियम, १९५८ अन्वये स्थापन केलेल्या अशा जिल्ह्याच्या क्षेत्रात येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्षेत्र समाविष्ट असल्याचे मानण्यात येईल ;

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

१९५९ चा मुंबई ५१. (ञ) " विक्रीकर अधिनियम " याचा अर्थ, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९, असा आहे आणि त्यामध्ये मुंबई विक्रीकर नियम, १९५९ याचा समावेश होतो ;

(ट) " अनुसूची " याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(ट) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ड) " कर " याचा अर्थ, या अधिनियमान्वये देय असलेला कर, असा आहे ;

(ढ) " मालाचे मूल्य " याचा अर्थ, आयात केलेल्या मालाचे खरेदी मूल्य, म्हणजे, वाहतूक, आवेष्टन, पाठवणी व हाताळणी आकार, अडत, विमा, कर, शुल्के व तत्सम बाबी यांवरील खर्चाचा अंतर्भाव करून, आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये भरण्यात आलेली जकात किंवा प्रवेश कर वगळून, ज्या किंमतीला माल खरेदी केलेला आहे ती खरेदीची किंमत, असा आहे, किंवा आयातकर्त्याने जर असा माल खरेदी केलेला नसेल तर, मालासोबतच्या कागदपत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे असलेले

मालाचे मूल्य, किंवा अशी कागदपत्रे नसतील त्याबाबतीत, तशाच वर्णनाचा व प्रतीचा माल सामान्यपणे ज्या किंमतीला विकण्यात येतो ती किंमत विचारात घेऊन, निर्धारण प्राधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल असे मालाचे मूल्य, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न करण्यात आलेले, परंतु विक्रीकर अधिनियम किंवा मुंबई विक्रीकर नियम, १९५९ यात व्याख्या करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अनुक्रमे त्या अधिनियमान्वये किंवा त्या नियमांन्वये जे अर्थ नेमून देण्यात आलेले असतील तेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

## नोंदणी करणे, कर बसविणे आणि तपासणी नाकी स्थापन करणे

कर बसविणे.

**३.** (१) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात उपभोग, वापर किंवा विक्री करण्यासाठी अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालाच्या, त्या क्षेत्रातील प्रवेशावर, त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये त्यातील प्रत्येक मालासमोर अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या दराने कर बसविण्यात येईल व वसूल करण्यात येईल आणि वेगवेगळ्या मालांच्या किंवा मालांच्या वेगवेगळ्या वर्गांच्या किंवा स्थानिक क्षेत्रातील व्यक्तींच्या वेगवेगळ्या प्रवर्गांच्या बाबतीत वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील. कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ढ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मालाच्या मूल्यावर कर बसविण्यात येईल. राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, उक्त अनुसूचीतील नोंदींमध्ये भर घालता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा त्या वगळता येतील आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर ती अनुसूची त्यानुसार सुधारित असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, कोणत्याही वस्तूच्या संबंधात, शासनाने विनिर्दिष्ट करावयाचा कराचा दर हा, विक्रीकर अधिनियम, मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ याअन्वये त्या वस्तुसाठी विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा अधिक असणार नाही : १९५८ चा मुंबई ६६. १९६२ चा महा. ९.

परंतु आणखी असे की, या अधिनियमान्वये आयातकर्त्याकडून देय असलेला कर हा, आयातकर्त्याने माल जेथे खरेदी केला असेल त्या संघ राज्यक्षेत्रात किंवा राज्यात अंमलात असलेल्या सर्वसाधारण विक्रीकर अधिनियमान्वये काही कर भरला असल्यास, तेवढ्या रकमेने कमी केला जाईल :

परंतु असेही की, विहित करण्यात येईल अशा प्रक्रियेच्या प्रयोजनार्थ, स्थानिक क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या विनिर्दिष्ट मालावर आणि जर असा प्रक्रिया केलेला माल राज्याबाहेर पाठवला जाणार असेल तर, अशा मालावर कोणताही कर बसवण्यात आणि वसूल करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही स्थानिक क्षेत्रात प्रवेश करताना, वाहनाला जोडलेल्या इंधन टाकीमध्ये त्याच्याच वापरासाठी असलेले कोणतेही इंधन किंवा इतर उपभोग्य वस्तू यांच्या प्रवेशावर या अधिनियमाखाली कोणताही कर बसवला जाणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, तेथे उपभोग, वापर किंवा विक्री करण्यासाठी असेल अशा पेट्रोल आणि उच्च वेग डिझेल तेल यांच्या प्रवेशावर, पोट-कलम (१) अनुसार बसविण्यायोग्य असलेल्या कराव्यतिरिक्त, एक रुपया प्रति लिटर या दराने देखील कर बसविला जाईल.

(३) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये नोंदणीसाठी पात्र नसलेला कोणताही आयातकर्ता हा, या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असणार नाही आणि कोणताही आयातकर्ता कोणत्याही वर्षात या अधिनियमान्वये नोंदणीसाठी पात्र झाल्यास, तो अशाप्रकारे नोंदणीसाठी पात्र होण्याच्या लगतपूर्वी स्थानिक क्षेत्रात केलेल्या कोणत्याही मालाच्या प्रवेशावर त्याने कर भरणे आवश्यक असणार नाही.

(४) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये बसविलेला कर, विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा वेळेत आयातकर्त्याकडून देय असेल.

(५) पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यात पुनर्विक्री करण्याच्या किंवा आंतर-राज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात विक्री करण्याच्या किंवा भारताच्या राज्यक्षेत्राच्या बाहेर निर्यात करण्याच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही स्थानिक क्षेत्रामध्ये असा माल आणणाऱ्या, विक्रीकर अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही व्यापाऱ्याने आयात केलेल्या विनिर्दिष्ट मालावर कोणताही कर बसवला जाणार नाही :

परंतु, जर असा कोणताही व्यापारी, राज्यात पुनर्विक्री करण्याच्या किंवा आंतर-राज्य व्यापाराच्या किंवा वाणिज्याच्या ओघात विक्री करण्याच्या किंवा भारताच्या राज्यक्षेत्राच्या बाहेर निर्यात करण्याच्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट मालाची आयात केल्यानंतर, अशा मालाचा कोणत्याही प्रकारे उपभोग घेईल किंवा त्याची पुनर्विक्री करण्याशिवाय कोणत्याही अन्य पद्धतीने त्याचा व्यवहार करील तर, तो, त्या मालाचा अशा रीतीने उपभोग घेतल्याच्या किंवा व्यवहार केल्याच्या महिन्यानंतरच्या महिन्याच्या दिनांक २५ च्या आत निर्धारण प्राधिकाऱ्याला त्याबाबत कळवील आणि पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये जो अन्यथा बसला असता असा कर भरील :

१९५६ चा ७४. [1][परंतु आणखी असे की, ज्या विक्रीला केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ चा खंड (ख), किंवा यथास्थिति, कलम ६ चे पोट-कलम (२) लागू होते अशा विक्रीचा, आंतर-राज्य व्यापार किंवा वाणिज्य यांच्या ओघात केलेल्या अथवा राज्यात पुनर्विक्री करताना केलेल्या विक्रीमध्ये अंतर्भाव असणार नाही.]

(६) कोणत्याही व्यापाऱ्याने, वरकरणी, यथास्थिति, पुनर्विक्रीच्या किंवा विक्रीच्या प्रयोजनासाठी म्हणून विनिर्दिष्ट मालाची आयात केल्यावर, अशा मालाचा अन्य पद्धतीने व्यवहार केला किंवा त्याचा उपभोग घेतला आणि पोट-कलम (५) मध्ये तरतूद केल्यानुसार निर्धारण प्राधिकाऱ्याला कळविले नाही किंवा पोट-कलम (५) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विनिर्दिष्ट कालावधीत कर भरला नाही तर, निर्धारण प्राधिकारी, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये असा व्यापारी जेवढा कर भरण्यास पात्र असेल तेवढ्या कराची रक्कम निर्धारित करील आणि देय असलेल्या कराच्या रकमेइतकी शास्तीही बसवील.

(७) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये बसविलेला व वसूल केलेला हा कर, राज्यात कलम २ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ज) मधील उप-खंड (एक) ते (पाच) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, स्थानिक प्राधिकरणासह कोणत्याही प्राधिकरणाकडून जकात किंवा प्रवेशकर म्हणून बसविलेल्या व वसूल केलेल्या कराव्यतिरिक्त असेल.

---

१. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५९ द्वारे पहिल्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(शा.म.मु.) एच ४१८८—३ (६,०६७—८-२००९)

नोंदणी. ४. (१) (क) या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असलेला प्रत्येक आयातकर्ता, जर तो विक्रीकर अधिनियमान्वये नोंदणीकृत किंवा नोंदणी करण्यास पात्र असलेला व्यापारी असेल तर, या अधिनियमान्वये नोंदणी करण्याकरिता, त्या प्रयोजनासाठी विहित करण्यात येईल अशा वेळेत, विहित नमुन्यात, निर्धारण प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(ख) ज्याचा खंड (क) खाली समावेश होतो असा व्यापारी सोडून अन्य एखादा आयातकर्ता, त्याने एखाद्या वित्तीय वर्षात कोणत्याही वेळी आयात केलेल्या विनिर्दिष्ट मालाचे मूल्य दहा हजार रुपयांहून अधिक होत असेल तर, तो, या अधिनियमान्वये नोंदणी करण्याकरिता, निर्धारण प्राधिकाऱ्याकडे विहित कालावधीत व विहित नमुन्यात अर्ज करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्याच्याकडे अर्ज करण्यात आला असेल अशा प्राधिकाऱ्याची, तो अर्ज या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असल्याबाबत खात्री पटल्यावर, तो, अर्जदाराची नोंदणी करील आणि अर्जदाराला विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(३) नोंदणीकृत आयातकर्त्यास, त्याची नोंदणी रद्द करण्यासाठी निर्धारण प्राधिकाऱ्याकडे विहित रीतीने अर्ज करता येईल आणि उक्त प्राधिकारी, जर त्याची,—

(क) अर्जदार आयातकर्ता असण्याचे संपुष्टात आले असेल, किंवा

(ख) अर्जदाराने विक्रीकर अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) च्या तरतुदीअनुसार आपला व्यवसाय हस्तांतरित केला असेल, किंवा

(ग) अर्जदाराने उक्त व्यवसायाच्या मालकीमध्ये बदल केले असतील, किंवा

(घ) अर्जदाराने व्यवसाय पूर्णपणे बंद केला असेल, किंवा

(ङ) अर्जदाराने व्यवसायाचे कोणतेही जादा ठिकाण बंद केले असेल, किंवा

(च) अर्जदाराने व्यवसायाची जागा बदलून तो स्थानिक क्षेत्राबाहेर नेला असेल,

अशी खात्री पटली तर, तो, त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करील, आणि असे रद्द करणे, रद्द करण्याचा आदेश दिलेल्या महिन्याच्या लगतनंतर येणाऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासून अंमलात येईल.

तपासणी नाकी स्थापन करणे. ५. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे प्रत्येक स्थानिक क्षेत्राच्या प्रवेशाच्या ठिकाणी तपासणी नाके स्थापन करता येईल व अशा तपासणी नाक्याचा प्रभारी अधिकारी आणि त्याच्या अधिकारितेचे क्षेत्र देखील त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करता येईल.

(२) तपासणी नाक्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास, विनिर्दिष्ट माल वाहून नेणाऱ्या एखाद्या मालवाहनाचा ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीला ते वाहन, तपासणीसाठी, आवश्यक तेवढ्या वाजवी वेळासाठी थांबविण्यास फर्मावता येईल.

(३) एखाद्या मालवाहनातून कोणताही विनिर्दिष्ट माल नेला जात आहे किंवा कसे व त्या मालाचा स्थानिक क्षेत्रात उपभोग, वापर किंवा विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ ते आयात करण्यात आले आहे किंवा कसे, याची सुनिश्चिती करण्यासाठी, तपासणी नाक्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास, त्या वाहनातून वाहून नेला जात असलेल्या मालाची व उक्त व्यक्तीकडून वाहून नेण्यात येणाऱ्या मालाशी संबंधित दस्तऐवजांची तपासणी करता येईल.

## प्रकरण तीन

## करविषयक प्राधिकारी, कराची विवरणे, निर्धारण, प्रदान, कराची वसुली व परतावा, अपिले, पुनर्विलोकन व पुनरीक्षण.

**कर, शास्ती आणि व्याज आकारणे व वसूल करणे.**

६. (१) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना व त्याखाली केलेल्या नियमांना अधीन राहून, विक्रीकर अधिनियमान्वये करांचे निर्धारण, पुनर्निर्धारण, वसुली व सक्तीचे प्रदान याबाबत त्या त्या वेळेपुरते अधिकार प्रदान केलेले प्राधिकारी हे, या अधिनियमान्वये एखाद्या व्यापाऱ्याने किंवा आयातकर्त्याने द्यावयाचा कर किंवा व्याज किंवा शास्ती ही जणू काही विक्रीकर अधिनियमान्वये द्यावयाचा कर किंवा व्याज किंवा शास्ती आहे असे समजून, या अधिनियमान्वये त्या आयातकर्त्याकडून देय असलेले कोणतेही व्याज किंवा शास्ती यासह कराचे निर्धारण, पुनर्निर्धारण, वसुली करतील व सक्तीने प्रदान करून घेतील, आणि या प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाखाली त्यांना असलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार त्यांना वापरता येतील आणि विवरणे, व्यवसाय चालवणाऱ्या व्यक्तीची कर दायित्वे अशा व्यवसायाच्या हस्तांतरितीवर किंवा उत्तराधिकाऱ्यावर लादणे, कोणत्याही भागीदारी संस्थेच्या किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाच्या कर भरण्याच्या दायित्वाचे, अशी भागीदारी संस्था विसर्जित झाल्यास किंवा अशा कुटुंबाचे विभाजन झाल्यास, हस्तांतरण करणे, त्रयस्थ पक्षांकडून कर वसूल करणे, अपिले, दुरुस्ती, पुनर्निर्धारण, पुनरीक्षण, निर्देश, परतावा, शास्ती, व्याज आकारणी वा व्याज प्रदान, व्यवसायाच्या परिवास्तूचे निरीक्षण, दस्तऐवजांची जप्ती, अपराध आपसात मिटविणे आणि व्यापाऱ्याने दिलेले दस्तऐवज गोपनीय ठेवणे यांच्याशी संबंधित तरतुदींसह त्या अधिनियमाच्या तरतुदी त्यानुसार लागू होतील.

(२) विक्रीकर अधिनियमाखालील एखाद्या अपराधासाठी खटला भरण्याऐवजी शास्ती लादण्यासंबंधातील किंवा एखाद्या अपराधासाठी असलेली शास्ती अथवा शिक्षा यांच्या जोडीला लादलेल्या शास्तीसंबंधातील तरतुदींसह, अपराध, व्याज व शास्ती यासंबंधातील सर्व तरतुदी, आवश्यक त्या फेरबदलांसह, या अधिनियमान्वये वसूल करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही कराचे निर्धारण, पुनर्निर्धारण, वसुली व सक्तीचे प्रदान यासंबंधात किंवा या अधिनियमाखालील कर हा, जणू काही विक्रीकर अधिनियमाखालील कर होता असे समजून, अशा निर्धारणाच्या, पुनर्निधारणाच्या, वसुलीच्या व सक्तीच्या प्रदानाच्या संबंधातील कोणत्याही प्रक्रियेच्या संबंधात, लागू होतील.

## प्रकरण चार

## अपराध व शास्ती

**अपराध.**

७. (१) या अधिनियमान्वये नोंदणीकृत असलेला किंवा नोंदणी करून घेण्यास पात्र असलेला कोणताही आयातकर्ता,—

(क) या अधिनियमान्वये त्याच्यावर आकारलेला कोणताही कर किंवा लादलेली कोणतीही शास्ती किंवा बसवलेले व्याज दिलेल्या अवधीत भरण्यात कसूर करील ; किंवा

(ख) या अधिनियमाच्या अथवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन करण्याची कृती करील,

तर, तो, दोष सिद्ध झाल्यानंतर, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होण्यास पात्र असेल.

(२) या अधिनियमान्वये नोंदणीकृत असलेला किंवा नोंदणी करून घेण्यास पात्र असलेला कोणताही आयातकर्ता,—

(क) बुद्धिपुरस्सर खोटे विवरण सादर करील ; किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विवरण सादर करण्यात कसूर करील ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये त्याच्याकडून देय असलेली कोणत्याही कराची आणि अन्य कोणतीही रक्कम भरण्यात लबाडीने टाळाटाळ करील,

तर, दोष सिद्ध झाल्यानंतर, जर तो त्याचा पहिला अपराध असेल तर, दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची आणि जर तो त्याचा दुसरा वा त्यानंतरचा अपराध असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कैदेची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होण्यास पात्र असेल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, आयात केलेल्या मालाच्या संबंधात किंवा उक्त मालाची ने-आण वा आयात करण्याच्या संबंधात कोणत्याही तपासणी नाक्याच्या अधिकाऱ्यासमोर किंवा निर्धारण प्राधिकाऱ्यासह कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर असे कोणतेही निवेदन किंवा प्रतिज्ञापत्र करील की, जे निवेदन वा प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे तिला माहित आहे अथवा तसे समजण्यास कारण आहे अशी व्यक्ती, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कैदेची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होण्यास पात्र असेल.

(४) ज्या कोणत्याही व्यक्तीचा, या अधिनियमान्वये देय असलेला कोणताही कर भरण्यास लबाडीने टाळाटाळ करण्यात किंवा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करण्यात किंवा टाळाटाळ करण्यास अपप्रेरणा देण्यात कोणत्याही प्रकारे जाणीवपूर्वक संबंध असेल अशी व्यक्ती, दोष सिद्ध झाल्यानंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतकी साध्या कैदेची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होण्यास पात्र असेल.

शास्ती. ८. कोणताही व्यापारी किंवा आयातकर्ता, या अधिनियमान्वये कर भरण्यास तो पात्र नाही अशा आशयाचा कोणताही दावा करण्याच्या हेतूने किंवा त्यास पुष्टी देण्याच्या हेतूने खोटे देयक किंवा खरेदी वा विक्री प्रमाणक, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र अथवा अन्य दस्तऐवज देईल किंवा सादर करील त्याबाबतीत, निर्धारण प्राधिकारी, तो दस्तऐवज खोटा होता, असे उघडकीस आल्यावर, आयातकर्त्यास, शास्ती म्हणून,—

(एक) कोणत्याही वित्तीय वर्षात पहिल्या वेळी असा अपराध उघडकीस येईल तेव्हा, अशा मालाबाबत बसवलेल्या किंवा बसवण्यायोग्य असलेल्या कराच्या दुप्पट रक्कम भरण्याचा निदेश देईल ; आणि

(दोन) त्याच वित्तीय वर्षात दुसऱ्या वेळी आणि त्यानंतरच्या वेळी असा अपराध उघडकीस येईल तेव्हा, अशा मालाबाबत बसवलेल्या किंवा बसवण्यायोग्य असलेल्या कराच्या तिपटीइतकी रक्कम भरण्याचा निदेश देईल :

परंतु, या कलमान्वये शास्ती भरण्याकरिता कोणताही निदेश देण्यापूर्वी, आयातकर्त्यास आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

९. (१) शासनाची पूर्वमंजुरी असल्याखेरीज, या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही. क्षतिपूर्ती.

(२) शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, या अधिनियमाद्वारे अथवा त्याअन्वये त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्याच्या ओघात किंवा त्याच्यावर सोपवलेली कार्ये पार पाडताना, त्याने केलेल्या अशा कोणत्याही कृतीबद्दल, अशी कृती सद्‌भावनापूर्वक करण्यात आली असल्यास कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीमध्ये जबाबदार धरले जाणार नाही.

१०. (१) राज्य शासन, या अधिनियमाखाली **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याच्या अधिकाराचा वापर, अशा नियमांच्या पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून करील : **नियम करण्याचा अधिकार.**

परंतु, जेव्हा नियम प्रथमच केले जातील तेव्हा ते, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीशिवाय करता येतील.

(२) या अधिनियमात अन्यत्र समाविष्ट असलेल्या, नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता, राज्य शासनास, सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील आणि अशा नियमांमध्ये या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी, फी आकारणीच्या नियमांचा समावेश असू शकेल.

(३) या संदर्भात केलेल्या कोणत्याही तरतुदीस बाध न आणता, या अधिनियमाखाली केलेला कोणताही नियम अशा रीतीने करता येईल की तो, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिवसाच्या अगोदरचा नसेल अशा कोणत्याही दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने अंमलात येईल.

(४) राज्य शासनास असा निदेश देता येईल की, कोणतेही नियम करताना, त्यांचा भंग केल्यास दोन हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल आणि तो अपराध करणे चालू राहील तेव्हा, तो अपराध करणे चालू असण्याच्या कालावधीत दररोज शंभर रुपयांपेक्षा जास्त नसेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

(५) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, ती अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करणे.

११. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही शंका किंवा अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे, ती शंका किंवा अडचण दूर करण्याच्या दृष्टीने, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील किंवा असे निदेश देता येतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २००२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

१२. (१) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अध्यादेश, २००२ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००२ चा महा. अध्या. ११.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा करण्यात आलेले नामनिर्देशन, नेमणूक किंवा नियम यांसह) ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअनुसार करण्यात आलेली गोष्ट, केलेली कार्यवाही किंवा यथास्थिति काढलेली अधिसूचना व केलेले नामनिर्देशन असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

[कलमे २(१)(ट) आणि ३(१)(क) पहा]

| अनुक्रमांक (१) | मालाचे वर्णन (२) | कराचा दर (३) |
|---|---|---|
| १ | उच्च वेग डिझेल तेल,— | |
| | (क) बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकांच्या स्थानिक क्षेत्रात आयात केलेले ; आणि | रुपयातील चौतीस पैसे |
| | (ख) उपरोक्त खंड (क) मध्ये नमूद केलेली क्षेत्रे वगळता अन्य स्थानिक क्षेत्रात आयात केलेले. | रुपयातील एकतीस पैसे |
| २ | विमानचालन वीजचक्की इंधन (दत्त-शुल्क) (Aviation Turbine Fuel) (Duty-paid) (नोंद ३ मध्ये सामाविष्ट असेल त्याव्यतिरिक्त). . . | रुपयातील पंचवीस पैसे |
| ३ | केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ च्या कलम १४ च्या खंड (दोन घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विमानचालन वीजचक्की इंधन (दत्त-शुल्क) (Aviation Turbine Fuel) (Duty-paid). | रुपयातील चार पैसे |
| ४ | विमानचालन वीजचक्की इंधन (शुल्कबंध) (Aviation Turbine Fuel) (Bonded). . . | रुपयातील तीस पैसे |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५ | विमानचालन गॅसोलिन (दत्त-शुल्क) (Aviation Gasolene) (Duty paid) | रुपयातील दहा पैसे |
| ६ | विमानचालन गॅसोलिन (शुल्कबंध) (Aviation Gasolene) (Bonded) | रुपयातील चोवीस पैसे |
| ७ | अन्य कोणत्याही प्रकारचे मोटार स्पिरीट,— | |
| | (क) बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई महानगरपालिकांच्या स्थानिक क्षेत्रात आयात केलेले ; आणि | रुपयातील तीस पैसे |
| | (ख) उपरोक्त खंड (क) मध्ये नमूद केलेली क्षेत्रे वगळता अन्य स्थानिक क्षेत्रात आयात केलेले. | रुपयातील एकोणतीस पैसे |
| ८ | बिटुमेन | रुपयातील पंधरा पैसे |
| ९ | लाइट डिझेल तेल | रुपयातील पंधरा पैसे |
| १० | नाफ्ता | रुपयातील पंधरा पैसे |
| ११ | लो सल्फर हेवी स्टॉक (Low Sulphur Heavy Stock). | रुपयातील पंधरा पैसे |
| १२ | केरोसीन-सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील नसलेले ((Non PDS). | रुपयातील वीस पैसे |
| [1][१३ | (क) हेवी फर्नेल तेल, आणि (ख) रेसिड्युअल फर्नेल तेल, यांसह पेट्रोलियम इंधन तेले.] | रुपयातील पंधरा पैसे. |

[1] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे ही नोंद दाखल करण्यात आली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई